|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५७२७६, २२५७२७७ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६,**

**Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406**

**Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in**

जा.क्र.उमवि/१३/एस.सी.ॲण्ड एस.टी सेल/ ०४ /२०१९ दि.११/०१/२०१९

**महत्वाचे व कालमर्यादित**

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व
समाजकार्य महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना...

**विषय** :-सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षण व सुधारित बिंदूनामावलीबाबतच्या शासननिर्णयाच्या अनुषंगाने सुधारित बिंदूनामावली तपासण्याबाबत.

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्रक्र.५८१ए/२०१८/१६.ब, दि.०५ डिसेंबर, २०१८ व दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीचे शुध्दीपत्रक.

२) दि.०७ जानेवारी, २०१९ रोजीचा छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतचा शासननिर्णय.

महोदय / महोदया,

सरळसेवा भरतीसंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.५८१ए/२०१८/१६-ब, दि.५ डिसेंबर २०१८ निर्गमित केलेला आहे. **सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (एसईबीसी)** (Socially and Educationally Backward Classes) असा नवीन प्रवर्ग तयार करण्यात आला असून या वर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे. शासननिर्णयासोबत सुधारित बिंदूनामावली जोडलेली आहे. तसेच संदर्भ पत्र क्र. २ अन्वये छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

यासंदर्भात दि.०७/०१/२०१९ रोजी मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत मुंबई येथे बैठक झाली, त्यात बिंदूनामावली व पदभरतीसंदर्भात चर्चा झाली असून बिंदूनामावली त्वरित तपासून घेण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने यासंदर्भात विद्यापीठात दि.१० जानेवारी २०१९ रोजी अनुदानित महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांच्या विद्यापीठात झालेल्या बैठकीत मा. कुलसचिव महोदयांनी दि. ०५ डिसेंबर, २०१९ नुसार बिंदूनामावली कशी भरावी यासंदर्भात मार्गदशन केले. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे बिंदूनामावली तपासण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे :

**वेळापत्रक**

| अ.क्र. | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १. | १२/०१/२०१९ | धुळे शहर व धुळे जिल्ह्यांतील सर्व महाविद्यालये |
| २. | १३/०१/२०१९ | जळगाव शहर, चाळीसगाव, पारोळा, चोपडा, अमळनेर |
| ३. | १४/०१/२०१९ | जळगाव जिल्ह्यांतील उर्वरित सर्व महाविद्यालये |
| ४. | १५/०१/२०१९ | नंदुरबार शहर व नंदुरबार जिल्ह्यांतील सर्व महाविद्यालये |

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयांनी दि. १२.०१.२०१९ ते १५.०१.२०१९ दरम्यान विद्यापीठ कार्यालयात बिंदू नामावली तपासून दिली जाणार असून महाविद्यालयांनी येतांना सोबत खालील प्रमाणे कागदपत्र आणावीत :-

१. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), जळगाव विभाग, जळगाव यांनी दि. १.१०.२०१७ रोजीच्या विद्यार्थी संस्थेनुसार कार्यभार तपासून दिला असल्याबाबतचे पत्र.
२. महाविद्यालयाने यापूर्वी दि. २४.०८.२०१५ च्या शासन निर्णयानुसार विषय निहाय तपासलेली बिंदूनामावली.
३. दि. ०५.१२.२०१८ नुसार विषय निहाय नविन बिंदूनामावली.

...2/-

४. दि. २४.०८.२०१५ च्या अनुषंगाने तपासून दिलेल्या बिंदूनामावलीनंतर आजपर्यंत झालेल्या घडामोडी जसे की, सेवानिवृत्त, मयत, सोडून गेलेले व जात प्रमाणपत्र व जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केलेले असल्यास तशी बिंदूनामावलीमध्ये नोंद घेवून त्याबाबतचा पुरावा.

५. बिंदूनामावलीच्या प्रस्तावाला मा. संस्था चालक/मा. प्राचार्य यांचे कव्हरींग लेटर.

६. यापूर्वी बिंदूनामावली तपासल्यानंतर जर भरती प्रक्रिया केलेली असेल तर त्याबाबत खालील प्रमाणे कागदपत्र जोडावीत.
अ) जाहिरात मंजुरीचे पत्र ब) मा. सह संचालक, (उ.शि.), जळगाव विभाग, जळगाव यांचे नाहरकत प्रमाणपत्र, क) विद्यापीठाने दिलेल्या मान्यता पत्राची प्रत, ड) संबंधित उमेदरवाराचे नियुक्तीपत्र, रुजू अहवाल, जातीचा दाखला, जातीचे वैधता प्रमाणपत्र सोबत जोडावे.

७. दि. ५ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयामधील परिशिष्ट - 'ब' भरुन त्यावर मा. संस्था चालक/ मा. प्राचार्य यांची स्वाक्षरी घेवून सादर करावे.

८. दि. १९ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयामधील परिशिष्ट - 'क' भरुन त्यावर मा. संस्था चालक/ मा. प्राचार्य यांची स्वाक्षरी घेवून सादर करावे.

९. सोबत जोडलेल्या हमीपत्रावर मा. संस्था चालक/ मा. प्राचार्य यांची स्वाक्षरी घेवून सादर करावे.

तसेच दि. ५ डिसेंबर २०१८, १९ डिसेंबर, २०१८ व दि. ०७ जानेवारी, २०१९ चा शासननिर्णय व त्यासोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार सुधारित बिंदूनामावली तयार करावयाची आहे. तरी सदर शासननिर्णयाचे तंतोतंत पालन करण्यात यावे, शासनाच्या आदेशानुसार मेगाभरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने बिंदूनामावली तपासून घेण्याची कार्यवाही उपरोक्त ठरवून दिलेल्या वेळापत्रका प्रमाणे त्वरीत करावी अन्यथा होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची / महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी व विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

Sd/-
**उपकुलसचिव**
एस.सी.ॲण्ड एस.टी.सेल

**सोबत**: परिशिष्ट अ, ब, क, ड,इ,ई,

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०००३२
२) मा.कुलगुरु महोदय, कबचौउमवि, जळगाव
३) मा.प्र-कुलगुरु महोदय, कबचौउमवि, जळगाव
४) मा.कुलसचिव महोदय, कबचौउमवि, जळगाव
५) मा.सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, नाशिक विभाग, नाशिक
६) मा.संचालक, उच्चशिक्षण, पुणे,
७) मा.सहसंचालक, उच्चशिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.
८) मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि,जळगाव.

## शिक्षक पदांसाठी आवश्यक कागदपत्रे

१. शासनाकडील पदनिश्चितीचे पत्र.
२. संस्थेच्या लेटरहेडवर कव्हरींग लेटर - दोन मूळ प्रती.
३. संस्थेच्या लेटरहेडवर हमीपत्र - दोन मूळ प्रती.
४. परिशिष्ट - 'अ' दोन प्रती.
५. परिशिष्ट- 'ब' दोन प्रती.
६. परिशिष्ट - 'क' दोन प्रती.
७. परिशिष्ट - 'ड ' दोन प्रती.
८. परिशिष्ट - 'इ ' दोन प्रती.
९. परिशिष्ट - 'ई ' दोन प्रती.
१०. कार्यरत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र.
११. राजीनामा/सक्ती सेवानिवृत्ती बाबतची सर्व कागदपत्रे.

# परिशिष्ट - ‘अ’

संवर्ग निहाय पदाचा गोषवारा दिनांक अखेर

पदनाम :- विषय:- मंजुर पदे:- भरती प्रकार :- सरळसेवा भरती

| तपशील | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | इमाव | विमाप्र | एसईबीसी | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदावर आवश्यक आरक्षण | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | १९% | २% | १६% | ३२% | १००% |
| आवश्यक पदे | | | | | | | | | | | |
| कार्यरत पदे | | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट - 'ब'

| अ.क. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज ७% | विजा अ ३% | भज ब २.५% | भज क ३.५% | भज ड २% | विमाप्र २% | इमाव १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मंजूर पदे | | | | | | | | | | |
| २. | भरलेली पदे | | | | | | | | | | |
| ३. | दि. ३०.११.२०१८ रोजी रिक्त पदे | | | | | | | | | | |
| ४. | दि. ०१.१२.२०१८ ते ३१.१२.२०१९ या कालावधीतील संभाव्य रिक्त पदे | | | | | | | | | | |
| ५. | एकूण रिक्त पदे | | | | | | | | | | |

मा. अध्यक्ष / मा. प्राचार्य
सही व शिक्का

शासन निर्णय क्र. बीसीसी२०१८/प्र.क्र.५८१ए/२०१८/१६-ब    दि. १९ डिसेंबर, २०१८ रोजीचे शुध्दीपत्रकानुसार

## परिशिष्ट - 'क'

| अ.क. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज ७% | विजा अ ३% | भज ब २.५% | भज क ३.५% | भज ड २% | विमाप्र २% | इमाव १९% | खुला/ अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मंजूर पदे | | | | | | | | | | |
| २. | भरलेली पदे | | | | | | | | | | |
| ३. | दि. ३०.११.२०१८ रोजी भरावयाची पदे | | | | | | | | | | |
| ४. | दि. ०१.१२.२०१८ ते ३१.१२.२०१९ या कालावधीतील संभाव्य भरावयाची पदे | | | | | | | | | | |
| ५. | एकूण भरावयाची पदे | | | | | | | | | | |

मा. अध्यक्ष / मा. प्राचार्य
सही व शिक्का

**परिशिष्ट - 'ड'**

**संस्थेच्या/ महाविद्यालयाच्या लेटरहेडवर**

**हमी पत्र**

१. शिक्षक संवर्गातील कार्यरत, मागासवर्गीय अध्यापकांची जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयात जतन करण्यात आलेले असून सदर अध्यापकांची यादी सोबत जोडत आहोत.

२. संस्थेतील शिक्षक संवर्गातील कोणतेही प्रकरण मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ नाही.

३. संस्था राज्यस्तरीय आहे/नाही.

४. आमच्या संस्थेचे महाविद्यालय इतर कोणत्याही विद्यापीठाशी संलग्नीत नाहीत.

५. बिंदूनामावली नोंदवही तपासणीचे संदर्भात आम्ही सादर केलेली सर्व माहिती अचूक व खरी आहे. माहिती खोटी व चुकीची असल्याचे आढळून आल्यास त्याची जबाबदारी संस्था / महाविद्यालयाची राहील.

६. आमच्या संस्थेचे/महाविद्यलयाचे कुठल्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही. असल्यास त्यास संस्था/ महाविद्यालय जबाबदार राहील.

७. सदर पदाची क.ब.चौ. उ.म.वि., जळगाव आरक्षण कक्षाकडून प्राथमिक तपासणी झाल्यानंतर मागास वर्ग कक्ष, नाशिक यांचेकडून अंतिम तपासणी केल्याशिवाय पुढील पदभरती करण्यात येणार नाही याची हमी देतो.

मा. अध्यक्ष / मा. प्राचार्य
सही व शिक्का

# परिशिष्ट - 'इ'

**संस्थेचे नाव :-**

**महाविद्यालयाचे नाव :-**

**विद्यापीठ संलग्नीत क्रमांक:-**

**पदाचे/संवर्गाचे नाव :-**

**मंजुर पदे :-**

**भरलेली पदे :-**

**भरती प्रकार :-**

**महिलांसाठी सरळ सेवा भरतीमध्ये ३० % आरक्षणानुसार माहितीचा तक्ता**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या महिलांची संख्या | मंजूर पदांवर प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या महिलांची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अनु. जाती | | |
| २ | अनु. जमाती | | |
| ३ | विजा - अ | | |
| ४ | भज - ब | | |
| ५ | भज - क | | |
| ६ | भज - ड | | |
| ७ | इमाव | | |
| ८ | विमाप्र | | |
| ९ | खुला | | |
| | एकूण | | |

मा. अध्यक्ष / मा. प्राचार्य
सही व शिक्का

# परिशिष्ट - 'ई'

**संस्थेचे नाव :-**

**महाविद्यालयाचे नाव :-**

**विद्यापीठ संलग्नीत क्रमांक :-**

**दिनांक अखेर अपंग प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांच्या माहितीचा गोषवारा**

**(अनुदानित)**

| अ.क्र. | पदाचा प्रवर्ग | एकूण मंजूर पदांची संख्या | एकूण कार्यरत पदसंख्या | एकूण रिक्त पदसंख्या | अपंग पदांची माहिती | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ३% टक्केनुसार जाणारी पदे | कार्यरत पद संख्या | | | रिक्त पदे |
| | | | | | | अंध | अस्थिव्यंग | मुकबधीर | |
| १. | सहायक प्राध्यापक | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

मा. अध्यक्ष / मा. प्राचार्य
सही व शिक्का